ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १० सप्टेंबर, १९५२ | अंक १७

## विविध माहिती

**बिहारमधील नवे पाटबंधारे**—१९५२ च्या एप्रिल ते जूनपर्यंत बिहार राज्यांत ११,००० छोटीं पाटबंधाऱ्यांचीं कामें नव्यानें पूर्ण करण्यांत आलीं. ह्या पाटबंधाऱ्यांना सुमारें १९ लाख रुपये खर्च आला आणि त्यांच्या पाण्यामुळें २२,००० एकर जमिनीला हुकमी पाणीपुरवठा होऊं शकेल.

**रशिआला जाणारें ब्रह्मी शिष्टमंडळ**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें आपलें एक प्रतिनिधी मंडळ रशिया आणि चीन ह्या देशांतील जमिनीचें राष्ट्रीयीकरण आणि सामुदायिक शेती ह्यांचा अभ्यास करण्यासाठी पाठविलें आहे. रशिआंत ४ आठवडे व चीनमध्यें ३ आठवडे राहिल्यानंतर इस्राइलमधील जमीन-सुधारणांचाहि तें अभ्यास करील.

**रशिअन कामगारांची मदत**—मद्रास राज्यांतील रायलसीमा आणि इतर दुष्काळपीडित भागांतील लोकांना वांटण्यासाठी रशिआंतील कामगारांच्या मध्यवर्ती संस्थेनें १,००० टन गहूं, ५,००० टन तांदूळ आणि गोठवलेल्या दुधाचे ५ लाख डबे पाठविले आहेत.

**भारतासाठी हेलिकॉप्टर्स**— भारत-अमेरिका तांत्रिक कराराच्या अटींप्रमाणें भारताला अमेरिकेकडून पुढील वर्षी दोन हेलिकॉप्टर्स मिळणार आहेत. हवेंत सरळच वर जाणाऱ्या ह्या विमानांचा टोळांचा नाश करण्याच्या कामांत फार चांगला उपयोग होतो. शिवाय त्यांना उड्डाण करतांना पळण्यासाठी जागाहि कमी पुरते.

**जर्मनींतील यंत्रसामुग्रीचा उपयोग**— भारताला युद्धांतील नुकसानभरपाई म्हणून कांहीं ड्रिलिंग मशिन्स मिळालीं आहेत. जपानला क्राइसलर मोटारगाड्या जुळविण्याचीं कांहीं यंत्रें मिळालीं आहेत. प जर्मनींतून चालू वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत २१·४ कोटी मार्कस् किंमतीच्या मोटार-सायकली निर्यात करण्यांत आल्या.

**ब्रिटिश नाटककाराला दंड**—कायद्यानें ठरविलेल्यापेक्षा अधिक वेगानें मोटार हांकल्याबद्दल सुप्रसिद्ध ब्रिटिश नट आणि नाटककार मि. नोएल कॉवर्ड ह्यांना १ पौंड दंडाची शिक्षा करण्यांत आली.

**मद्रास शहराचें दळणवळण**—मद्रास शहराचें भारतांतील इतर मोठ्या शहरांशीं रेडिओ-टेलिफोननें दळणवळण ठेवण्याची व्यवस्था करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. ही व्यवस्था प्रत्यक्षांत आल्यावर मद्रास शहर हें मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि रंगून ह्या शहरांशीं जोडलें जाईल.

**फक्त लोखंडविषयक वाचनालय**—स्विट्झरलंडमधील एका गांवीं फक्त लोखंडविषयक माहिती देणारें ग्रंथालय नुकतेंच सर्व लोकांना खुलें करण्यांत आलें आहे. हें ग्रंथालय एका ११ व्या शतकांतील मठांत होतें. ग्रंथालयांत ह्या विषयावरील कांहीं हस्तलिखितेंहि आहेत. जुन्यांत जुनें हस्तलिखित १२५० मधील आहे.

**पाकिस्तान-रशिआ व्यापारी करार**—पाकिस्तान आणि रशिआ ह्या राष्ट्रांच्या दरम्यान ऐनजिनसी देवाणघेवाण करणारा एक व्यापारी करार होण्याचें घाटत आहे. पाकिस्तानकडून ताग आणि कापूस घेऊन त्यांच्या बदला रशिआ गहूं पुरविणार आहे.

**ऑस्ट्रेलिआची मदत**—भारताला गहूं विकत घेऊन देण्यासाठी ऑस्ट्रेलिअन सरकारनें ३७,००,००० ऑस्ट्रेलिअन पौंड रक्कम मंजूर केली आहे. गव्हाचें पीठहि ह्याच रकमेंतून विकत घेण्यांत येईल. सीलोनलाहि ३,००,००० ऑस्ट्रेलिअन पौंडांचा आटा पुरविला जाईल.

**स्वावलंबी कामगार**— सुरत येथील १५ गिरणी-कामगारांनीं एक सहकारी हौसिंग सोसायटी काढली आहे. सोसायटी बांधणार असणाऱ्या घरांपैकीं पहिल्या घराचा पायाभरणी-समारंभ नुकताच झाला. सरकारनें प्रत्येक कामगाराला ७५ चौरस फूट जागा आणि १,१०० रुपये बिनव्याजी दिले आहेत. अंगमेहनत कामगार स्वतःच करणार आहेत.

**बिहार सरकारनें केलेली खर्चांत बचत**—बिहार सरकारनें काटकसर केल्यामुळें राज्य-सरकारच्या खर्चांत १ कोटी रुपयांची बचत झाली आहे, असें समजतें. बचत-कमिटीनें केलेल्या इतर कांहीं शिफारसी अंमलांत आल्यावर आणखी ५० लाखांची बचत होईल. येवढी बचत करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें.

**भारताची औद्योगिक प्रगति**— ओरिसामधील एका कंपनीनें जर्मन कारखान्याची मदत घेऊन ट्रॅक्टर्स बनविण्याची योजना आंखली आहे. चालू वर्षअखेर उत्पादन सुरू होईल. मद्रासमधील एक कारखाना एका ब्रिटिश कारखान्याचें नांगर जुळविण्याचें काम करीत आहे. ह्या कारखान्यांत रोज १२ ट्रॅक्टर्स तयार होतात. मुंबईंतहि अमेरिकन मदतीनें ट्रॅक्टर्सचा कारखाना काढण्याचें घाटत आहे.

**मांसाच्या उत्पादनांत वाढ**— अमेरिकेच्या शेतकी-खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, जगांतील मांसाचें उत्पादन वाढलें असलें तरी वाढत्या लोकसंख्येला तें पुरवठ्यास पडत नाहीं. उत्पादन वाढूनसुद्धां १९५० सालीं दरडोई मांसाचा जितका खप होता, त्यापेक्षा १९५१ सालीं तो अधिक झाल्याचें दिसत नाहीं.

## सहकारी सोसायट्यांची अंतर्व्यवस्था

श्री. डी. ए. सावंत, डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर, कोल्हापूर, ह्यांच्या वरील पुस्तकाची दुसरी आवृत्ति* नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. "सोसायटीचा सेक्रेटरी हा सोसायटीचा खरा आत्मा आहे. त्यास सोसायटीच्या कामकाजाची माहिती परिपूर्ण असणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें त्याच्या दैनंदिन कामकाजांत येणाऱ्या अडचणी सोडविण्याच्या हेतूनें पत्रव्यवहार व प्रकरणीं कामें चालविण्याच्या दृष्टीनेंहि या पुस्तकांत भरपूर माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे." पुस्तकाची पहिली आवृत्ति १९४१ सालीं प्रसिद्ध झाली व ती तात्काळ खपलीहि. सहकारी चळवळीची अलीकडील वाढ लक्षांत घेऊन लेखकानें मूळ आवृत्तींत पुष्कळ सुधारणा केल्या आहेत आणि निरनिराळीं उपयुक्त अशीं प्रकरणें घातलीं आहेत. सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, श्री. पी. जे. चिन्मुळ्गुंद, ह्यांनीं पुस्तकास छोटीशी प्रस्तावना लिहिली आहे, आणि पुस्तककर्त्यानें महाराष्ट्रांतील ग्रामीण सोसायट्यांचे सभासद, तसेंच सहकाराशीं संबंधित असलेली सर्वसाधारण जनता, ह्यांची उपयुक्त अशी बहुमोल सेवा केली आहे, अशा शब्दांत पुस्तकाचा पुरस्कार केला आहे. सहकार्याचीं मूलतत्त्वें, सोसायटीची नोंदणी, नियमित व अनियमित जबाबदारी, सोसायट्यांचे प्रकार, खेड्यांतील स्वाभाविक सहकार्य, सोसायट्यांचा कारभार, भांडवलाची उभारणी, कर्जाचा व्यवहार, कमाल मर्यादापत्रक, जामिनदार व जामिनकी, ऐपतवान शेतकऱ्यांस कर्जपुरवठा, पैसा–ठेवणें–गुंतविणें–पाठविणें, जिंदगीपत्रक, लवाद दावे, निवाड्याची बजावणी, पोटनियम दुरुस्ती प्रकरण, सहकारी संस्थांना मिळालेल्या सवलती, सहकारी संस्थांना आर्थिक मदत, तपासणी अंमलदार व तपासण्या, जमाखर्च व ताळेबंद करण्याची रीत, सोसायटीचें दप्तर, चौकशी, लिक्विडेशन, अशा बावीस प्रकरणांत आणि ३९२ पृष्ठांत लेखकानें सहकारी सोसायटीसंबंधीं सांगोपांग विवेचन केलें आहे. पुस्तकाची भाषा सोपी असून विषय समजावून देण्याची पद्धति आकर्षक आहे. सहकारी चळवळीची अंतिम प्रगति सहकारी संस्थांतील कार्यक्षम नोकरवर्गावर अवलंबून असल्यानें, अशा नोकरवर्गाच्या शिक्षणाचें काम अगत्याचें व मूलभूत महत्त्वाचें ठरतें. ह्या दृष्टीनें श्री. सावंत ह्यांच्या पुस्तकाकडे पाहिलें असतां, मराठी सहकारी वाङ्मयाची त्यांची सेवा बहुमोल ठरेल ह्यांत संशय नाहीं.

---

### प्रत्येक चेकवर सहा पेन्स आकार

चालू खात्यावर काढलेल्या प्रत्येक चेकवर सहा पेन्स चार्ज घेण्याचें स्कॉटिश बँकांनीं ठरविलें आहे. १ सप्टेंबरपासून ही आकारणी सुरू झाली. प्रत्येक महिन्यांतील रोजच्या किमान शिलकीच्या प्रत्येक पुऱ्या १०० पौंडांस दरमहा ६ पेन्स, ह्याप्रमाणें दर सहामाहीस खातेदारास सूट दिली जाईल. स्कॉटिश बँका इतके दिवस चालू खातें चालविण्याबद्दल खातेदाराकडून कोणताच आकार घेत नसत. ज्या ठिकाणीं चेक वटविण्यासाठीं दिला जाईल, तेथील कचेरीवर चेक काढलेला नसेल तर १०० पौंडांस १ शिलिंग, असा वसुलीचा चार्ज घेण्यांत येई. ह्या पद्धतीप्रमाणें, चेक काढणाराला कांहींच खर्च न पडतां चेक ज्यास मिळावयाचा त्याला मात्र भुर्दंड पडे. ह्या पद्धतीविरुद्ध बरीच टीका झाली, म्हणून वरील सुधारणा करण्यांत आली आहे.

* लेखक : डी. ए. सावंत, रामनिवास, शाहुपुरी, कोल्हापूर. पृ. सं. ३९२. किं. ४ रु.

### उत्तर प्रदेशांतील सहकारी चळवळ

उत्तर प्रदेश सरकारच्या सहकारी खात्याचे उपमंत्री श्री. मंगल प्रसाद ह्यांनीं राज्यांतील सहकारी चळवळीविषयीं वृत्तपत्रकारांशीं नुकतीच अनौपचारिक चर्चा केली. ह्या चर्चेच्या प्रसंगानें राज्य-सरकारच्या सहकारी चळवळीविषयींच्या धोरणावर चांगला प्रकाश पडतो. श्री मंगल प्रसाद म्हणाले कीं, प्रत्येक सहकारी संस्थेसाठीं कार्यक्षम आणि दानतीचे कार्यकर्ते शोधण्यांत आले पाहिजेत. संस्थांच्या नोंदणीबाबत जो कालापव्यय होतो तो शक्य तितका कमी करण्यांत आला पाहिजे आणि ह्या संस्थांमार्फत ग्रामोद्योगांची स्थापना करण्यांत आली पाहिजे. श्री. मंगल प्रसाद ह्यांच्याबरोबर असलेले विकास व योजना कमिशनर म्हणाले कीं आर्थिक नियोजन अंमलांत आणण्यासाठी सहकारी संस्था ह्याच सर्वांत अधिक उपयोगी पडण्यासारख्या आहेत. खेड्यांना वीज पुरवितां आल्यावर तेथें ग्रामोद्योग काढणें अधिक सोईचें होईल आणि स्वतःच्या मालकीची जमीन नसलेल्या शेतमजुरांच्या योगक्षेमाचा प्रश्नहि सुटेल. ग्रामोद्योगांना बँकांकडून जीं कर्जें मिळतील त्यांवरील व्याजाचा दर कमी करण्याची खटपट सरकार करीत आहे. नोंदणीसाठी येणाऱ्या अर्जांची ताबडतोब दखल घेण्याचे हुकूमहि देण्यांत आले आहेत. सहकारी पद्धतीनें काय होऊं शकतें ह्याविषयीं बोलतांना श्री. मंगल प्रसाद ह्यांनीं इटावा जिल्ह्यांतील एका खेडेगांवाचा मुद्दाम उल्लेख केला. ह्या खेडेगांवांतील लोकांनीं स्वतः पुढाकार घेऊन वर्गणी जमा केली आणि गांवाला विजेचा पुरवठा उपलब्ध करून दिला आहे.

---

### सिन्नर सेक्रेटरी क्लास उद्घाटन

नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर तालुक्यांत सिन्नर येथें सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें उद्घाटन ता. ३१–८–१९५२ रोजीं दुपारीं ३ वाजतां, सिन्नर तालुका सुपरवायझिंग युनिअनचे ऑफिसांत प्राध्यापक एस्. जी. पुराणिक यांचे हस्तें करण्यांत आलें. दिवाणबहादूर आर. व्ही. वंडेकर हे त्यांच्या जरूरीच्या आकस्मित कारणामुळें उद्घाटनास येऊं शकले नाहींत. या उद्घाटनास रावसाहेब मामलेदार, श्री. रावसाहेब देशमुख, खालकर वकील, बँक इन्स्पेक्टर, ट्रेनिंग इन्स्पेक्टर, सुपरवायझर आणि श्री. कपोते आणि विद्यार्थी व इतर प्रमुख शेतकरी व सहकारी कार्यकर्ते मिळून एकूण ७५चे वर समाज जमला होता.

सदर प्रसंगीं क्लासची प्रास्ताविक माहिती दिल्यानंतर क्लास-संबंधीचें माहितीपर भाषण श्री. एन. वाय. कुलकर्णी, श्री. देशमुख, श्री. खारकर व रावसाहेब मामलेदार यांनीं केल्यावर अध्यक्षांनीं सहकारी चळवळीचें अंतिम ध्येय समजावून देऊन भारतांतील सर्व कामें सहकारानें केल्यास सरकारास तसेंच जनतेस सुखावह होईल आणि राष्ट्राचें कार्य करण्यास सुलभ होईल, त्यासाठीच सहकारी तत्त्व व हिशोबाची माहिती व त्याबद्दल शिक्षणवर्गाच्या आवश्यकतेचें महत्त्व सांगितलें व समारंभ पार पडला.

---

### ४६ नव्हे, ३२

बॉंबे स्टेट कंझ्युमर्स को. सोसायटी लि. च्या ७७ दुकानांपैकीं ४६ दुकानें बंद करण्यांत आलीं आहेत, अशी वार्ता प्रसिद्ध झाली होती, ती चूक आहे. जूनमध्यें ५ आणि त्यानंतर २७ अशीं ३२ दुकानें बंद करण्यांत आलीं असून ४५ दुकानें पूर्ववत चालू आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. १० सप्टेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे ·
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कारखान्यांची सर्वांगीण कार्यक्षमता वाढविण्याचें अगत्य

हिंदी कारखानदारांनीं कारखान्यांची सर्वांगीण कार्यक्षमता वाढविण्याचा सल्ला श्री. श्रीराम ह्यांनीं इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या वार्षिक सभेचे वेळीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत दिला. अमेरिका, जपान, इत्यादि पुढारलेल्या औद्योगिक राष्ट्रांतून औद्योगिक उत्पादन आणि संघटना ह्या दोन्हीं बाबतींत फारच जलद प्रगति झालेली आहे, आणि त्याबाबत शास्त्रीय पद्धतींचा त्यांनीं मोठ्या प्रमाणावर अवलंब केलेला आहे. अमेरिकेंत वेगवेगळ्या उद्योगधंद्यांतील स्वतंत्र उत्पादनवाढीचा आणि कार्यक्षमतेचा अभ्यास करण्यासाठीं गेल्या चार वर्षांत ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडे ४७ मंडळें पाठविलीं आणि अनेक उद्योगधंद्यांना समान असणाऱ्या अशा महत्त्वाच्या प्रश्नांच्या अभ्यासासाठी तज्ज्ञांचीं १९ मंडळें पाठविलीं. त्यामुळें, ग्रेट ब्रिटनमधील कारखानदारींतील सर्व श्रेणींत व विभागांत उत्पादनवाढीच्या जाणीवेची स्फूर्ति प्रभावी होऊं लागली आहे. अशाच प्रकारच्या शिक्षणासाठी लायक माणसांना जपानकडे तेथील औद्योगिक कार्यक्षमता, उत्पादनाचा दर्जा उच्च राखण्याची आकडेवारी नियंत्रणें, उद्योगधंद्यांत गुंतलेल्यांची विशिष्ट मनोवृत्ति, कामाची शास्त्रशुद्ध आखणी, वेळ–हालचाल–काम इत्यादींचा वेतनाशीं संबंध, इत्यादींचें शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यांत यावें, अशी श्री. श्रीराम ह्यांनीं सरकारला व उद्योगपतींना विनंति केली. एकाददुसऱ्या कारखान्यानें स्वतःपुरती प्रगति करून पुरणार नाहीं; जागतिक बाजारपेठांतून सर्वच हिंदी कारखानदारीबद्दल आदर व विश्वास निर्माण झाला पाहिजे. जसजसें अशा प्रकारचें ज्ञान फैलावेल, तसतसा त्याचा सुपरिणाम दिसूं लागेल. उत्पादनखर्च कमी करून मालाचा दर्जा अत्युत्कृष्ट केल्याविना हिंदी मालास बाजारपेठांतून टिकाव धरतां येणें अशक्य आहे.

परदेशी शास्त्रीय उत्पादनपद्धति आयात करून ती आपल्या कारखानदारींत उतरविणें आणि त्याबरोबर परदेशी भाग-भांडवलाच्या आयातीसहि प्रोत्साहन देणें ह्यांत फार फरक आहे. ज्या उत्पादनाचे बाबतींत हिंदी लोकांनीं प्रारंभ केलेला आहे, अशा कारखानदारींत परदेशी भांडवलास प्रवेश मिळूं देऊं नये; तेल शुद्ध करण्याच्या कारखान्यांसारख्या अवघड व विशेष प्रकारच्या कारखान्यांसाठी खासगी परदेशी भांडवल येऊं देण्यास हरकत नाहीं; तेवढ्यापुरतेंच तें मर्यादित ठेवावें; असें श्री. श्रीराम ह्यांनीं सांगितलें. अर्थात्, स्वदेशी भांडवल अधिकाधिक पुढें आलें पाहिजे हें उघड आहे. त्यासाठीं श्री. श्रीराम ह्यांनीं उपाय सुचविले आहेत—भागीदारांनीं डिव्हिडंडचा कांहीं अंश प्रेफरन्स भागांचे स्वरूपांत स्वीकारावा, कामगारांनीं बोनसच्या ऐवजीं प्रेफरन्स भाग घ्यावेत, यंत्रसामुग्री नवी बसविण्यासाठी पैसा मिळावा ह्याकरितां सरकारनें मोठ्या कारखान्यांच्या उत्पादनावर लहानशी पट्टी बसवावी व त्या पट्टीची जमलेली रक्कम ज्या त्या कारखान्याला विशिष्ट खर्चासाठीं परत द्यावी, इत्यादि. श्री. श्रीराम ह्यांचा दृष्टिकोन उद्योगपतींचा आहे; तेव्हां मॅनेजिंग एजंटांच्या नफ्यावर व त्याच्या विनियोगावर त्यांनीं निर्बंध न सुचविणें स्वाभाविकच आहे.

नव्या कारखान्यांच्या स्थापनेस सरकारनें प्रोत्साहन द्यावें, त्यांच्यासाठीं करविषयक सवलतींची मुदत वाढवावी, कांहीं मूलग्राही महत्त्वाच्या धंद्यांची मुद्दाम जोपासना करून त्यांची वाढ करावी व त्यांना खास सवलती द्याव्या, राष्ट्रीयीकरणाची भीति नष्ट करण्यांत यावी, संरक्षण प्रत्येक वेळेस दिलें जातें तें दीर्घ मुदतीसाठीं देण्यांत यावें, संरक्षणाचा उपभोग घेणाऱ्या कारखान्यांची त्यांचें उत्पादन, कार्यक्षमता, मालाचा दर्जा, उत्पादनाचा खर्च, इत्यादि दृष्टींनें वारंवार तपासणी करण्यांत यावी, येथें तयार होणाऱ्या उपभोग्य मालाशीं स्पर्धा करणाऱ्या परदेशी मालाची भरमसाट आयात होऊं देऊं नये, निर्गत व्यापारास अधिकांत अधिक सहाय्य करावें, इत्यादि महत्त्वाच्या सूचनाहि त्यांनीं केल्या. अन्नधान्य, कच्चा माल आणि यंत्रसामुग्री ह्यांच्या चालू राहणाऱ्या आयातीस लागणारा पैसा निर्गत मालाच्या किंमतींतूनच उभारला जाणार असल्यानें, निर्गत होण्याजोग्या मालाच्या उत्पादनास जाणूनबुजून जास्त संरक्षण व प्रोत्साहन देणें अगत्याचें आहे. श्री. श्रीराम ह्यांनीं उत्पादनांतील कार्यक्षमता वाढविण्यासाठी सुचविलेल्या उपायांचा अवलंब व कारखानदारांस सरकारचें विशेष सहाय्य ह्यांची प्रगति जोडीनेंच झाली पाहिजे; केवळ सरकारी मदतीनें भागणार नाहीं हें उघड आहे. ह्या दृष्टीनें, कारखानदारांवर राष्ट्रीय, आर्थिक, औद्योगिक व लष्करी प्रगतीच्या दृष्टीनें फारच मोठी नैतिक जबाबदारी येऊन पडते. ती उचलण्यास कारखानदार समर्थ ठरोत.

---

## पुणें सें. को. बँकेची प्रगति

पुणें सेंट्रल को. बँकेची वार्षिक सभा रविवार, दि. ७ रोजीं झाली. त्यावेळीं गेल्या वर्षीचे अध्यक्ष, श्री. य. द. खोले, ह्यांनीं बँकेच्या कारभाराचा व सहकारी कर्जपुरवठ्याच्या प्रगतीचा आपल्या भाषणांत उत्कृष्ट आढावा घेतला. बँकेची विशेषतः गेल्या १० वर्षांत फारच वाढ झाली आहे. ठेवी सुमारें १½ कोटी रुपयांवर जाऊन खेळतें भांडवल १ कोटि, ६२ लक्ष रुपये झालें आहे. बँकेस जोडलेल्या सोसायट्यांची संख्याहि वाढत गेली आहे. १० वर्षांपूर्वी बँकेच्या खेळत्या भांडवलाचा फार मोठा भाग सरकारी रोख्यांत गुंतवला जात असे अशी तक्रार होती; आतां सोसायट्यांकडील कर्जाचें प्रमाण वाढून तें ५२·४% झालें आहे. शेतकी कर्जपुरवठ्याच्या नव्या धोरणाचा हा परिणाम आहे. बँकेची मजबुती सालोसाल वाढत गेली आहे, आणि सवलतीच्या दरानें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळत असल्यानें शेतकऱ्यांच्या अधिकाधिक गरजा भागविणें तिला शक्य होत आहे. सर्व प्रकारच्या तरतुदी करून व शक्य तेवढा फायदा हिशेबांत

मुळूनहि बँकेस गेल्या वर्षी ८१,००० रु. नफा झाला, तो आतां पर्यंतच्या कोणत्याहि वर्षाच्या नफ्यापेक्षां ज्यास्त आहे.

पुणें सें. को. बँकेच्या आजवरच्या प्रगतीस अनेक तज्ञ व स्वार्थत्यागी डायरेक्टरांचा व अध्यक्षांचा हातभार लागलेला आहे गेल्या सुमारें १० वर्षांत ज्यांचेकडे बँकेचें नेतृत्व होतें, त्यांत श्री. सोले हे एक प्रमुख होते. ह्यादृष्टीनें बँकेच्या सध्याच्या अभिनंदनीय परिस्थितीचा मोठा वांटा त्यांचेकडे जातो. त्यांची दक्षता, स्वार्थत्याग, दीर्घोद्योग, मिळतें घेण्याची हातोटी, लोकशाही प्रवृत्ति, अभ्यासू वृत्ति, इत्यादींबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. प्रा. धनंजयराव गाडगीळ डायरेक्टर नसतांनाहि त्यांच्या बहुमोल सल्ल्याचा लाभ बोर्डास वेळोवेळीं सतत मिळवून देऊन, श्री. सोले ह्यांनीं बँकेचें धोरण व त्याची दिशा निरपवाद राखण्याचें फारच मोठें कार्य केलें आहे. अशा रीतीनें, मुंबई राज्यांतील मध्यवर्ती बँकांत पुणें सें. को. बँकेस मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. त्यांच्या यशाच्या वाटेकरी सहकाऱ्यांचा येथें उल्लेख न करण्याचें कारण, श्री. सोले हे बँकेच्या कार्यकारी मंडळांतून आतां कायमचे निवृत्त होणार आहेत असें समजतें.

पुणें जिल्ह्यांतील सहकारी चळवळीस त्यांची निवृत्ति जाणवल्या-सेरीज रहाणार नाहीं बँकेच्या वाढलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास नव्या-नव्या लोकांनीं पुढें यावें व बँकेच्या कार्यकर्त्यांची निःस्वार्थी सेवेची प्रथा पुढें चालवावी, हें योग्यच ठरतें. परिस्थितीमुळें विद्यालयीन शिक्षण घेऊं न शकलेला परंतु उद्योगी व शिकाऊ वृत्तीचा कार्यकर्ता कळकळ असल्यास किती महत्त्वाचें कार्य करूं शकतो, हें श्री. सोले ह्यांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. त्यांचेबरोबर श्री. य. द. ओगले हेहि निवृत्त होत आहेत. त्यांनींहि गेलीं कित्येक वर्षें बँकेचे डायरेक्टर म्हणून काम केलें आहे व चेअरमनहि ते झालेले आहेत. त्यांच्या कामगिरीचाहि बोर्डानें गौरव केलेला आहे.

---

### सोव्हिएट रशिआचें कोळशाचें उत्पादन

आधुनिक काळांत राष्ट्रांचें सामर्थ्य त्यांच्या अवजड उद्योगधंद्यांत होणाऱ्या उत्पादनावर अवलंबून असतें. ह्या उद्योगधंद्यांत कोळशाचा धंदा एक प्रमुख धंदा आहे. रशिआच्या 'टास' वृत्तसंस्थेनें रशिआंतील कोळशाच्या उत्पादनासंबंधीं पुढील माहिती दिली आहे. 'टास'च्या माहितीप्रमाणें रशिआंत युद्धपूर्व काळांत कोळशाचें जितकें उत्पादन होत असे त्याच्या ७० टक्के अधिक उत्पादन १९५१ सालीं होत होतें. कोळशाच्या उत्पादनाच्या बाबतींत रशिआनें आतां युरोपांत पहिलें स्थान पटकाविलें आहे. रशिआच्या अर्थव्यवस्थेसाठीं जवळजवळ ५० कोटी टन उत्तम प्रतीच्या कोळशाचें उत्पादन होणें आवश्यक आहे आणि हें उद्दिष्ट लवकरच गांठण्यांत येईल असा अंदाज आहे. उत्पादन वाढण्यास मुख्यतः दोन कारणें आहेत. कोळशाच्या नव्या खाणी उघडतांना त्या जास्तींत जास्त मोठ्या आणि अद्यावत यंत्रसामुग्रीनें सज्ज अशा उघडण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणें जुन्या खाणींत सुधारणा करून त्यांच्यांतहि नवी यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे. गेल्या पांच वर्षांत खाणींत वापरण्यासाठीं तयार केलेले निरनिराळे १०० यंत्रांचे नमुने बनविण्यांत आले आहेत. रशिआंतील कोळशाच्या खाणींतून अपघात जवळ जवळ होतच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. त्याचप्रमाणें, रशिआंतील कोळसा-कामगाराला इतर कामगारांपेक्षां सर्वांत अधिक वेतन मिळतें. रशिआचा पंचवार्षिक कार्यक्रम अधिकृतरीत्या लवकरच जाहीर करण्यांत येणार आहे. त्या कार्यक्रमांत ठरविलेल्या औद्योगिक उत्पादनासाठीं जरूर तो कोळसा खाणी पुरवितील, असा विश्वास वाटतो.

## डॉ. शाक्ट जर्मन परराष्ट्रीय व्यापाराच्या सेवेस पुनः तयार

### नवी बँक काढणार

१० लक्ष मार्क ( सुमारें १०½ लक्ष रु. ) भांडवलाची फर्म काढून हँबर्ग येथें बँकिंगचा व्यवसाय सुरू करण्याची डॉ. शाक्ट ह्यांची इच्छा आहे. ह्या फर्मचें नांव डॉ. ह्यालमर शाक्ट आणि कं. असें असून तिचे भागीदार डॉ. शाक्ट ( वय ७५ वर्षें ) व हेर वाल्डेमार लुडविग ( वय ५२ वर्षें ) असे आहेत, आणि त्यांस हेर थाइमर हे मिळाले आहेत. डॉ. शाक्ट हे हिटलरचे जादूगार अर्थज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. हेर लुडविग ह्यांनीं डॉ. शाक्ट ह्यांच्या हाताखालीं राइश्स् बँकेंत काम केलेलें आहे आणि तेहि परदेशी हुंडणावळीच्या प्रश्नांचे आणि व्यापारी धोरणाचे तज्ञ आहेत. फर्मचें स्वरूप ओफेन हांडेल्स गेसेलशाफ्ट असें आहे. म्हणजे, कंपनीच्या व्यवहाराची अमर्यादित जबाबदारी सर्व भागीदारांनीं पत्करलेली आहे. औद्योगिक, व्यापारी आणि शेती व्यावसायिकांनीं फर्मच्या जाहीर केलेल्या भांडवलाची उभारणी केली आहे. गेलीं कांहीं वर्षें डॉ शाक्ट ह्यांनीं आर्थिक सल्लागार म्हणून यशस्वी रीतीनें काम केलेलें आहे. इंडोनेशियाबाबत त्यांचा अहवाल बहुमोल असल्याचा इतर तज्ञांनीं अत्यंत अनुकूल अभिप्राय व्यक्त केलेला आहे. जर्मनीचा परराष्ट्रीय व्यापार वाढविणें व त्यासाठीं बँकिंग करणें हा नियोजित फर्मचा उद्देश असला, तरी परदेशीय सरकारांना फर्मचा आर्थिक सल्ला मिळूं शकेलच. डॉ. शाक्ट व हेर लुडविग हे दोघेहि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तज्ञ असून त्यांच्या जगभर पहिल्या दर्जाच्या लोकांशीं ओळखी आहेत आणि ते दीर्घोद्योगी आणि धोरणी आहेत, त्यामुळें फर्मचा व्याप लवकरच वाढेल ह्यांत नवल नाहीं. अर्थात् डॉ. शाक्ट ह्या जादूगाराचें जर्मन बँकिंग क्षेत्रांतील पुनरागमन कित्येकांना रुचणार नाहीं. " डॉ. शाक्ट हे सन्माननीय आणि विश्वासार्ह गृहस्थ नाहींत " ह्या मुद्यावर हँबर्ग सिटी गव्हर्मेंटनें त्यांना लायसेन्स देण्याचें नाकारलें, तेव्हां हँबर्ग अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कोर्टांत डॉ. शाक्ट ह्यांना आपली बाजू मांडावी लागली आहे. सात खटल्यांतून— न्यूरेंबर्ग इंटरनॅशनल वॉर क्राइम्स ट्राइब्यूनल सकट—ज्यांची सन्मानपूर्वक सुटका झाली, त्यांचेवर पुनः तेच तेच आरोप करून त्यांना लायसेन्स नाकारण्यांत आला ! त्यांचे अपीलाचा निकाल त्यांचे बाजूनें झाला आहे

---


दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराडचे

## —भागदारांस नोटीस—

बँकेच्या भागदारांची पसतिसावी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक २१-९-१९५२ रोजीं सकाळीं ७ वाजतां बँकेच्या नवीन सभागृहांत भरणार आहे. या सभेंत सन १९५१-५२ चा अहवाल, ताळेबंद व नफा-वांटणी मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती, ऑडिटर्सची नेमणूक वगैरे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेप्रमाणें विषयांचा विचार करणें, वगैरे कामें केलीं जातील. डायरेक्टर्सचे निवडणुकीबाबत मतें देण्याची वेळ सकाळीं ७-३० ते दुपारीं १२-३० अशी आहे. तरी बँकेच्या सर्व सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे

कराड, } शं. पु. कुलकर्णी<br>
दि. ३ सप्टेंबर १९५२ } मॅनेजिंग डायरेक्टर.

## किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.

वरील कंपनीनें ३१ मार्च, १९५२ अखेर संपलेल्या वर्षी ३७,२९,७१८ रु. ची विक्री केली. सर्व खर्च भागवून, २,९०,९८४ रु. घसारा काढून आणि १०,००० रु. गुडविल, २४,७४३ रु. प्राथमिक खर्च, २४,००० रु. अंडर रायटिंग कमिशन लिहून टाकून कंपनीस २,०३,९३६ रु. निव्वळ नफा उरला. गेल्या वर्षीचा १,४२८ रु. शिलकी नफा त्यांत मिळवला म्हणजे वांटणीसाठी २,०५,३६४ रु. उरतात. त्यापैकी ५,००० रु. बुडीत व संशयित कर्जाच्या रिझर्व्हमध्यें घालून २,००,३६४ रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करावे, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे.

नफा डिव्हिडंड देता येण्याजोगा असला, तरी मार्च, १९५२ नंतर खप उतरल्यामुळें आणि स्टोर्स, इंजिनांचे सुटे भाग व इंजिनें ह्यांचा साठा वाढून कंपनीजवळील रोकड शिल्लक रक्कम कमी झाल्यामुळें डिव्हिडंड वाटणें इष्ट वा शक्य होणार नाहीं, असें डायरेक्टरांनीं नमूद केलें आहे. तथापि, कंपनीची प्रगति भागीदारांना समाधानकारक वाटेल अशीच आहे. सुट्या भागांची अनिश्चित आयात, त्यामुळें ज्यास्त किंमत देऊन जर्मनीहून आणवावे लागलेले भाग, भारतांतच ते ज्यास्त किंमत देऊन करविण्याची पडलेली जरूरी, कांहीं वेळा विमानानें आयात करण्याची पडलेली आवश्यकता, इत्यादींमुळें उत्पादनक्षमतेपेक्षां प्रत्यक्ष उत्पादन थोडें कमी झालें आहे. एप्रिल, १९५१ पासून कंपनीचा कारखाना पुणें म्यु. कॉर्पोरेशनच्या जकातीच्या कक्षेंत आला, त्यामुळें सर्व खरेदीवर पूर्ण दरानें जकात द्यावी लागली. वरील सर्व गोष्टींमुळें, खर्चात सुमारें २ लक्ष रु. ची वाढ झाली; त्यामानानें नफा कमी उरला. विक्रीकर आणि एम्प्लॉईज स्टेट इन्शुअरन्स फंड ह्यांचा बोजाहि आतां वाढणार आहे.

सरकारनें वस्तुस्थिति नीट लक्षांत न घेतां, चुकीच्या आकड्यांवर विसंबून कमी अश्वशक्तीच्या डीझेल इंजिनांची भरमसाट आयात होऊं दिली. वास्तविक, युद्धकाळांत डीझेल इंजिनांची आयात झाली नव्हती त्यामुळें मागणी सांठून राहिली होती, एवढेंच. भारतांतील कांहीं भागांत पाऊस कमी पडला, त्याचप्रमाणें कपास, गूळ, तेलबिया, इत्यादींची किंमत उतरली त्यामुळें शेतकऱ्यांची इंजिनांची मागणीहि कमी झाली. सर्वसाधारण मंदीहि त्याच सुमारास एकदम येऊन तिनें परिस्थिति आणखीच बिघडवली आणि मार्च, १९५२ पासून विक्री फारच कमी झाली.

"अधिक धान्य पिकवा" मोहिमेसाठीं मध्यवर्ती सरकारनें राज्यसरकारांना सबसिडी दिली, त्यांतून जरूर तीं इंजिनें घेतांना शक्यतों हिंदी बनावटीचींच घेण्यांत यावीं, अशी सूचना भारत सरकारनें राज्यसरकारांना तात्काळ केली. मुंबई सरकारनेंहि ४ लक्ष रु. चीं इंजिनें वेळींच विकत घेऊन कंपनीचा कारखाना मंद गतीनें तरी चालू ठेवण्यास मदत केली.

१९५१-५२ चा नफा समाधानकारक असला तरी सद्यःपरिस्थिति चांगली नाहीं आणि १९५२-५३ संबंधीं तूर्त कांहीं सांगतां येणार नाहीं. कांहीं स्टोर्सच्या तारणावर इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें कंपनीला आणखी ५ लक्ष रु. चें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें, कंपनीची रोकड पैशाची परिस्थिति सुधारण्यास चांगली मदत होईल.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि उत्पादन व खप ह्यांकडे लक्ष ठेवून त्याबरोबरच कंपनीची रोकड पैशाची अडचण भागविण्यामध्यें मॅनेजिंग एजंटांनीं कौशल्य दाखविलें आहे. त्यांच्या आजवरच्या लौकिकामुळें, कंपनीच्या कार्यक्षम उत्पादनामुळें आणि वैयक्तिक प्रयत्नांमुळेंच हें शक्य झालें आहे. सध्याच्या तात्कालिक अडचणी लवकरच दूर होऊन कंपनीचा विस्तार तिच्या सामर्थ्याप्रमाणें व अपेक्षेप्रमाणें सत्वर होईल, असा विश्वास वाटतो.

---

**विहिरी खोदण्यास मदत**—हैदराबाद राज्यांतील उस्मानाबाद जिल्हा बोर्डानें खेडेगांवांत विहिरी खोदण्यासाठी २०,००० रुपये मंजूर केले आहेत. विहिरी खोदण्यासाठी गांवकऱ्यांनीं विनामूल्य श्रम करण्याचें कबूल केलें आहे, असें समजतें.

---


**दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.**

## —जाहीर खबर—

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ४१ वी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. २७ सप्टेंबर १९५२ रोजीं दुपारीं २ वाजतां (स्टॅं. टा.) बँकेच्या रजिस्टर्ड कचेरींत [ सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई ] खालील कामांकरितां भरविण्यांत येणार आहे.

(१) ३० जून १९५२ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफा-तोटापत्रक व संचालकमंडळाचा अहवाल स्वीकारणें.

(२) नफावांटणीचा दर जाहीर करणें.

(३) संचालकमंडळानें सुचविलेल्या पोटनियमांमधील दुरुस्त्या, युक्त वाटल्यास, विचारांत घेऊन स्वीकारणें [ ज्या जाहीर खबरी सोबत छापून जोडण्यांत येत आहेत ].

(४) हिशेबतपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहताना ठरविणें.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून
व्ही. एम्. ठाकोर,
जनरल मॅनेजर.

भागांच्या तबदिलीचें काम [ ट्रॅन्स्फरबुकें ] ता. १५।९।५२ ते २७।९।५२ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यास ता. १३।९।५२ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल झालेलीं असतील त्यांना सोमवार ता. १३ ऑक्टोबर १९५२ पासून मुंबई ऑफिसमध्यें त्याची रक्कम मिळूं लागेल.

---

**दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.**

## —जाहीर खबर—

जाहीर करण्यांत येतें कीं, ता. २९-९-१९५१ रोजीं भरलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्यें मंजूर झालेल्या ठराव नं. ५ [ अ ] अन्वयें व बँकेच्या पोटनियमांमध्यें करावयाच्या दुरुस्तीस मे. रजिस्ट्रार साहेब, सहकारी मंडळ्या-मुंबई प्रदेश, ह्यांची आतां रीतसर मंजुरी यादी नं. ३५९/७ ता. २३-८-१९५२ अन्वयें मिळाली असल्यानें ह्या बँकेनें नामाभिधान दि बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ऐवजीं दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि. असें ता. १ ऑक्टोबर १९५२ पासून चालू होईल.

व्ही. एम्. ठाकोर,
जनरल मॅनेजर.
बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

## शेतकीस कर्जपुरवठा : वाढलेल्या जबाबदाऱ्या

( श्री. य. द. खोले )

" आपल्या जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति समाधानकारकपणें झाली आहे असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. आपली बँक ही सहकारी बँक आहे व तिचा मूळ उद्देश जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविणें आहे. आणि त्या दृष्टीनें शेतकी सोसायट्या स्थापन होणेचे कामीं आपल्या बँकेनें बरेच परिश्रम केले. केवळ कर्ज देणाऱ्या संस्था असून उपयोगी नाहीं. तर शेतकी मालाच्या विक्री करणाऱ्या, शेतीसाठी लागणारी साधनसामुग्री पुरविणाऱ्या शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या, सहकारी पद्धतीवर शेती करून शेतकऱ्यांचे उत्पादनांत भर घालणाऱ्या, सोसायट्या असाव्यात. या दृष्टीनें दुसऱ्या महायुद्धानंतर बरेच प्रयत्न केले व सहकारी आर्थिक सहाय्य उपलब्ध झाल्यानें अशा योजनांना मूर्त स्वरूप येऊन त्यांचें दृश्यफळ दिसूं लागलें आहे याबरोबरच नागरी जीवनांतहि बरेच महत्त्वाचे फरक झाले व त्यामुळें सहकारी ग्राहक संस्था व हौसिंग सोसायट्या अस्तित्वांत आल्या.

" आपल्या बँकेच्या सेळत्या भांडवलापैकीं बराचसा भाग सन १९४०–४१ पर्यंत व पुढें कांहीं वर्षे सरकारी कर्जरोख्यांत गुंतला जात असे असा अपवाद होता. सुरवातीस सोसायट्यांकडे कर्ज सुमारें रु. ४९,५०० होतें तें पुढें पुढें वाढत जाऊन १४ लाखापर्यंत गेलें. हीं रकम पुढें ६,५९,८३२ रु. अशी सन १९४३–४४ मध्यें होती. यामध्यें पुढें वाढ होत होत आतां ती ६३,८६,५२९ रु. झाली आहे. यावरून बँकेचें शेतकी विषयक कर्जधोरणांत केवढा फरक झाला आहे हें दिसून येईल.

" आपल्या प्रांतांत सहकारी चळवळीची पुनर्घटना झाली आहे. ऐपतवान शेतकऱ्यांना शेतीउत्पादनासाठी माफक व्याजानें व वक्तशीर कर्ज पुरविण्याची जबाबदारी सहकारी संस्थांनीं स्वीकारली आहे आणि ही जबाबदारी योग्य रीतीनें पाळली आहे किंवा नाहीं हें पहाण्याचें काम प्रांतिक सहकारी बँकेकडे सोंपविलें आहे. या सालीं सरकारनें भांडवलाचे रूपानें व इतर आर्थिक सहाय्य देण्याचें मान्य केलें असून रिझर्व्ह बँकेकडूनही पैसा उपलब्ध करून देण्याची सोय केली आहे. नवीन योजनेमध्यें कर्ज पुरविणें ह्यासंबंधीं धोरण अगदीं नवीन आहे व त्या दृष्टीनें ऐपतवान शेतकऱ्यांची व्यवस्था केली असून चालू शेतीमधून हंगामशीर कर्जवसुलीचा आग्रह धरत असून कर्जासाठी अंतीम जरी जमीन तारण असली तरी उभ्या उत्पन्नाचे पिकांतूनच वसूल यावयास पाहिजे. चालू शेतीशिवाय शेती सुधारणा, बैल, नांगर, औत यासाठी मध्यम मुदतीचीं कर्जे देण्याची तरतूद योजनेखालीं आहे. जुन्या योजनेमध्यें मुख्यतः जिंदगीच्या किंमतीचा विचार करून कर्ज दिलें जात असे व त्यामध्यें उत्पन्नांतून कर्ज फिटणें याकडे यावें तिकडे लक्ष जात नसे. म्हणून जुनीं कर्जे नवीन करणें यापलीकडे फारसें करणें कठीण जात असे. या नवीन योजनेमध्यें शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याची दुहेरी व्यवस्था आहे, मात्र त्याबरोबरच पिकावर वसूल होण्याची दक्षता संस्था–चालकांनीं न घेतल्यास नवीन योजनांस कार्यवाहींत होणें अडचणीचें होईल. शेतकऱ्यांना कर्ज वक्तशीर मिळावं म्हणून बँकेनें स्थानिक अधिकाऱ्यांना अधिकार दिले आहेत; परंतु त्याचा योग्य फायदा मिळण्याचे दृष्टीनें कर्ज वसूल वक्तशीर होण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीनें सर्व सहकारी सोसायट्यांनीं प्रयत्न करणें आवश्यक आहे.

" नवीन स्वीकारलेल्या शेती–अर्थव्यवस्थेप्रमाणें जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्या व त्यामधील सभासद् यांमध्यें झपाट्यानें वाढ होत गेल्यानें सोसायटीस आवश्यक असणारे कर्जपुरवठा करणें अडचणीचें झालें. ही परिस्थिति प्रांतांतील सर्व मध्यवर्ती जिल्हा सहकारी संस्था व मुंबई प्रांतिक बँक यांनाही जाणवली. मुंबई प्रांतिक बँकेच्या बोर्डानें १९५१ मध्यें प्रांतांतील सर्व सहकारी बँकांना धोरण ठरवून दिलें. त्यामध्यें चालू शेतीस अग्रहक्क यावा, जुन्या सभासदांच्या गरजा प्रथम भागवाव्यात व आवश्यक असणाऱ्या रकमेची तरतूद झाल्याशिवाय तेवढ्या सोसायट्या वाढवू नयेत असें ठरविलें आपल्या जिल्ह्यांतील सोसायट्यांच्या चालकांची मध्यम मुदतीच्या कर्जाची मागणी चालू सालीं वरील धोरणामुळें पुरवितां आली नाहीं व ती मागणी पुरवितां यावी म्हणून बोर्डानें प्रांतिक बँक व सहकारी खातें यांचेकडे पत्रव्यवहार सुरू केला आहे. आपल्या बँकेच्या कर्जाची वर्गवारी करतांना असें दिसून येतें कीं, ३० जून, १९५२ ला आपल्या एकूण सेळत्या भांडवलापैकीं शेंकडा ५२·४ इतकें कर्ज आपण दिलें. हेंच प्रमाण ठेवीशीं बघतां तें ७१·६ असें पडतें. सहकारी सोसायट्यांना आपण ठेवीच्या दृष्टीनें विचार करतां ५५·५ टक्के कर्जे दिलीं असून व्यक्तिशः सभासदांना शेंकडा १६ टक्के कर्जे दिलीं असल्याचें दिसून येईल.

" मध्यवर्ती सहकारी बँक ही प्रायः शेती कर्जपुरवठा करण्याकरतां असल्यानें व शेती–उत्पादन हें मुख्यतः नैसर्गिक परिस्थितींवर व तसेंच सरकारच्या आर्थिक धोरणावर अवलंबून असल्यानें, सोसायट्यांचे कडील कर्जवसुलीचा प्रश्न हा नेहमीच चर्चेचा विषय रहाणार. तथापि सहकारी सोसायट्यांचे चालकांनीं नवीन शेतकी कर्ज पुरविण्याची जबाबदारी लक्षांत घेवून कर्जवसुलीची योग्य हंगामांत सटपट केल्यास वसूल वक्तशीर होईल आणि या कामीं जिल्ह्यांतील सुपरवायझिंग युनिअन्स यांचें योग्य असें सहाय्य मिळाल्यास वसुलीची कार्यक्षमता आहे यापेक्षांही जास्त वाढेल, असें वाटतें. नवीन शेतकी कर्जव्यवस्थेंतील दुसरा महत्त्वाचा भाग असा कीं शेतकऱ्यांची परतफेडीची ऐपत वाढविण्यासाठी शेती–सुधारण्यांचा योग्य असा कार्यक्रम आंखून त्यासाठीं बी–बियाणांपासून शेतीच्या कच्च्या मालाच्या उत्पादनापर्यंत व पक्क्या मालाचें उत्पादन हें सर्व सहकारी संस्थांमार्फत होण्याचा आग्रह सहकारी संस्था व कार्यकर्ते यांनीं धरणें आवश्यक आहे. व्यक्तिशः ऐपतवान शेतकऱ्यास कर्ज देण्याच्या योजनेचा अंतर्भाव या योजनेंत होत आहे, हें जरी खरें असलें तरी सहकारी संस्थांच्या सभासदांच्या आर्थिक सर्व गरजा आज भागवितां येणें शक्य नसल्यानें या प्रश्नाचा विचार करणें अडचणीचें होऊन बसलें आहे.

" वर वर्णन केलेल्या परिस्थितीवरून सर्वसाधारपणें असें दिसून येतें कीं, गेल्या दोन वर्षांत प्रांतांतील सर्व सहकारी संस्थांनीं शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्याची जबाबदारी घेतली असून, सर्वसाधारपणें मध्यवर्ती बँकांनीं आपल्या ठेवींपैकीं ६० ते ७० टक्के रकम कर्जव्यवहारांत गुंतविली असून, त्यापैकीं बराचसा मोठा भाग शेतकी सोसायट्यांच्या कर्जव्यवहारांत गुंतविलेला आहे. आणि या दृष्टीनें पुष्कळ वेळां असा प्रश्न विचारला जातो कीं, अशा तऱ्हेनें मोठ्या प्रमाणावर कर्ज देणें हितावह आहे किंवा कसें ? या दृष्टीनें विचार करतां असें दिसून येतें कीं, सर्व देशांतील शेतीप्रधान समाज हा सहकारी कार्यक्षेत्राखालीं येणें इष्ट असल्यामुळें त्यांच्या आर्थिक व इतर गरजा सहकारी संस्थांमार्फत भागविणें

इष्ट आहे आणि या दृष्टीनें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारनें सहकारी संस्थांना शेतकऱ्यांच्या गरजा पुरविण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याचें मान्य करून तें अंमलांतही आणलें आहे. तेव्हां शेतकी सोसायट्यांकडील कर्जरकमेंत वाढ झाली आहे यासंबंधीं विचार करण्यापेक्षां दिलेलीं कर्जे योग्य कारणासाठी वापरलीं जातात, हें पाहून वसुलाच्या बाबतींत योग्य ती दक्षता घेतल्यास काम भागण्यासारखें आहे असें वाटतें. "—पुणें सें. को. बँकेच्या वार्षिक सभेंत चेअरमन, श्री. य. द. खोले ह्यांचें भाषण.

## भारताच्या दीपगृहांची व्यवस्था

भारतीय सरकारच्या दीपगृहविषयक खात्यानें बऱ्याच दीपगृहांची सुधारणा करण्याचें ठरविलें आहे. सुधारणा–योजना अंमलांत आणण्यासाठी सुमारें ३ कोटी रुपये खर्च येणार असून संकल्पित योजनेसंबंधीं सरकारचें नियोजन–मंडळ सध्या विचार करीत आहे. भारतामधील जीं संस्थानें पूर्वी समुद्रकिनाऱ्याला लागून होतीं त्यांच्याकडे जवळपासच्या दीपगृहांची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी होती. पण आतां अर्थातच ही जबाबदारी भारतीय सरकारवर पडली आहे. सध्या भारताच्या सागरी अगर वैमानिक वहातुकीला मार्गदर्शन करणारीं १,७०० दीपगृहें आहेत. त्या सर्वांची नोंद एका मध्यवर्ती दप्तरांत करण्याचा सरकारचा विचार आहे. कारण, घटनेप्रमाणें दीपगृहें व तदनुषंगिक सर्व बाबी मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारांतील आहेत. बहुतेक सर्व दीपगृहें सध्या असमाधानकारक परिस्थितींत असून त्यांची दुरुस्ती ताबडतोब होणें आवश्यक आहे. दुरुस्त्यांसाठी चालू वर्षी १८·७५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सर्व दुरुस्ती–योजना पूर्ण होण्यास सुमारें ६३·५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्याशिवाय भांडवली स्वरूपाचा ७ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहे, तो वेगळाच. दीपगृहांच्या उपयोगासाठी ३० ते ४० लाख रुपयांच्या विशिष्ट प्रकारच्या बोटी विकत घेण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें, दीपगृहांच्या उपयोगासाठी रेडिओ व ध्वनिवाहक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी ५५ लाख रुपये खर्च व्हावयाचे आहेत. ह्या आधुनिक पद्धतीच्या योजनांवर सुमारे २८५·५ लाख रुपये खर्च होतील. परंतु तरीसुद्धा अंदमान व इतर कांहीं ठिकाणीं नवीं दीपगृहें बांधावयाचीं आहेत तीं बांधून होणार नाहींतच. अंदमान आणि निकोबार ह्या महत्त्वाच्या बेटांची व्यवस्था मध्यवर्ती सरकारकडे आहे. सध्यां ह्या बेटांवरून सागरी वहातुकीला मार्गदर्शन करण्याची कांहींच सोय नाहीं.

## रेल्वेवरील पहिला वर्ग नाहींसा होणार

१ ऑक्टोबर, १९५३ पासून हिंदी रेल्वेजवर एकहि पहिल्या वर्गाचा डबा पहावयास मिळणार नाहीं. त्यांची जागा दुसऱ्या वर्गाचे डबे घेतील. मेल गाड्यांस व कांहीं एक्सप्रेस गाड्यांस थोडे एअर कंडिशन्ड डबे लावले जातील, परंतु मागणीइतके तसले डबे लावले जाण्यास पुष्कळ वर्षे लागतील आणि त्यासाठी पहिल्या वर्गाचे डबे रद्द करण्याची योजना वाट पहाणार नाहीं.

## टाटा कंपनीचा बोनस

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. नें तिच्या कामगारांना १९५१–५२ सालाकरितां ३·२६ महिन्यांच्या पगाराइतका बोनस ( १०७ लक्ष रु. ) जाहीर केला, तो वांटण्यास २९ ऑगस्ट रोजीं प्रारंभ झाला. प्रत्येक कामगाराच्या बोनसपैकीं २५% रक्कम त्याच्या प्रॉव्हिडंट खातीं जमा केली जाईल.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन
१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.
वे स्ट र्न इं डि या
विमा कंपनीनें
आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा
यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.
दर हजारी त्रैवार्षिक बोनस
हयातींतील पॉलिसी रु. २७ — हयातीनंतरची पॉलिसी रु. ३३
कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी
वेस्टर्न इंडियाची निवड करा.
के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर
वेस्टर्न इंडिया लाईफ
इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.
शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर–ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१
फोन नंबर— ३४०२

ठेवी स्वीकारण्यांत येतात
ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७½ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.
पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## रिझर्व्ह बँकेचा १९५१-५२ चा वार्षिक अहवाल

जून १९५२ ला संपलेल्या वर्षात रिझर्व्ह बँकेचें उत्पन्न ११.११ कोटी रुपये होऊन खर्च ३.६१ कोटी रुपये झाला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टाच्या ४७ व्या कलमाप्रमाणें या बँकेनें मध्यवर्ती सरकारला द्यावयाच्या निव्वळ नफ्याची रक्कम या वर्षात ७.५० कोटी रुपये झाली असून १९५०-५१ मध्यें हीच रक्कम ८.३४ कोटी रुपये होती.

### नव्या चलनविषयक धोरणाचें यश

चलन फुगवट्यास आळा घालणें आणि बँकिंग पद्धतीवर रिझर्व्ह बँकेचें पूर्वीपेक्षांही अधिक नियंत्रण ठेवणें हे दोन हेतू बऱ्याच प्रमाणांत साध्य करून घेण्यांत १९५१ चे अखेरीस सुरू करण्यांत आलेलें नवें चलनविषयक धोरण यशस्वी झालें.

इतर डॉलरेतर देशांप्रमाणेंच १९५१ च्या उत्तरार्धात भारताची व्यापारी परिस्थिति बिघडली तरी त्यापुढील प्रश्न पश्चिम युरोप आणि अमेरिका या देशांपेक्षां निराळा होता. भारतापुढील प्रश्न पुनर्शस्त्रीकरणाचा नव्हता, तर आर्थिक तोल ढळूं न देतां सर्व-साधारण तूट व संभाव्य चलनवाढ यांच्या पार्श्वभूमीवर विकासा-करितां निधीची तरतूद करण्याचा होता.

देशांत बाहेरून आलेलें भांडवल सामावून घेण्याची आवश्य-कता असल्यानें १९५१ च्या दुसऱ्या तिमाहीपासूनची भारताच्या 'बॅलन्स ऑफ पेमेण्टस्' मधील मोठी तूट कांहीं प्रमाणापर्यंत योजनाबद्धच होती. रेल्वे, मध्यवर्ती आणि राज्यसरकारें यांचा १९५०-५१ मधील २५२ कोटी रुपयांचा विकास खर्च १९५१-५२ मध्यें वाढून ३१७ कोटी रुपयांवर गेला. ही वाढ पंचवार्षिक योजनेच्या कच्च्या मसुद्यांत दिल्याप्रमाणेंच झाली.

कर्जव्यवहारांतील वाढत्या अस्थिरतेस आळा बसावा हा इच्छित हेतु बँकरेट ३ टक्क्यांवरून ३॥ टक्के केल्यानें साध्य झाला. याचबरोबर कांहीं मुदतीसाठी भांडवल पुरविण्याकरितां शिड्यूल्ड बँकांकडून सरकारी रोखे विकत घेण्याऐवजीं त्यांना कर्ज देण्याच्या रिझर्व्ह बँकेनें स्वीकारलेल्या नव्या धोरणामुळें अस्थिरतेची वाढहि बंद झाली.

चलनवाढ विरोधी उपयायोजनांचा अंशतः परिणाम म्हणून जून १९५१ पासून किंमती उतरण्याच्या प्रवृत्तीस फेब्रुवारी ते मार्च १९५२ या मुदतींत आणखीच चालना मिळाली. आपली घसरगुंडीची परिस्थिति सुधारण्याची मालाचा जादा सांठा अस-लेल्या व्यापाऱ्यांची उत्कृष्ट इच्छा आणि निर्यात मागणींतील घट हीं त्यास कारणीभूत आहेत. मुख्यतः निर्यातीची परिस्थिति सुधारण्याच्या हेतूनें सरकारनें वेळींच केलेल्या उपाययोजनामुळें किंमती पूर्ववत होण्यास मदत झाली.

### बँकिंगची प्रगति

देशांतील बँकिंग पद्धति एकंदरीनें पूर्वीप्रमाणेंच भक्कम असली तरी अनेक बँकांच्या कामकाजाच्या पद्धतींत बरीच सुधारणा होण्यास वाव असल्याचें रिझर्व्ह बँकेनें केलेल्या पद्धतशीर तपासणीवरून दिसून आलें.

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रांत या वर्षांत रिझर्व्ह बँकेनें योजलेल्या खास उपाययोजनांपैकीं ग्रामीण विभागांत इंपिरिअल बँकेच्या नव्या तीस शाखा उघडण्याबाबतचा करार म्हणजे एक महत्त्वपूर्ण घटना होय. त्या बँकेस १३ शाखा उघडण्यासाठी परवाने देण्यांत आले आहेत.

ग्रामीण पतपद्धतीसंबंधीं दीर्घ मुदतीचें धोरण ठरविण्याच्या हेतूनें अखिल भारतीय ग्रामीण पतपद्धतीच्या पाहणीचें काम रिझर्व्ह बँकेनें हातीं घेतलें. प्रातिनिधिक भूमिकेवरून निवडलेल्या ७५ जिल्ह्यांतील सदरहू पाहणीचें काम पुरें होत आलें आहे.

रिझर्व्ह बँकेनें 'ब' विभागाचें राज्यांत व्यवहार करावेत या ग्रामीण बँकिंग चौकशीसमितीनें केलेल्या शिफारशीनुसार त्या बँकेनें मध्यभारत आणि त्रावणकोर-कोचीन सरकारांशीं करार केले असून त्यानुसार त्या राज्यांनीं रिझर्व्ह बँकेची आपली 'बँकर' म्हणून नेमणूक केली आहे.

अहवालाच्या वर्षात रिझर्व्ह बँकेनें सहकारी संस्थांना अल्पमुद-तीनें दिलेल्या कर्जाच्या रकमेंत वाढ होऊन १९५१-५२ मधील प्रत्यक्ष दिलेली रक्कम त्यामागील वर्षापेक्षां दुप्पट आहे.

---

### नव्या अर्थव्यवस्थेच्या जबाबदाऱ्या

'शेतकी कर्जपुरवठ्याचे बाबतींत व्यक्तिशः सभासदांना किंवा डायरेक्टरांना आतां स्वतंत्र धोरण आखणें किंवा प्रतिपादणें शक्य राहिलेलें नाहीं. सरकार, रिझर्व्ह बँक, प्रांतिक बँक, जिल्हा बँका, ह्या सर्वांचा त्यांत संबंध येतो. त्या प्रत्येकानें उचलावयाची जबाबदारी आतां ठरवून दिली गेलेली आहे, आणि ठरलेल्या धोरणाची अंमलबजावणी प्रत्येकानें करावयाची आहे. अर्थव्यवस्था नीट चालू रहाण्यासाठी त्या प्रत्येकानेंच कार्यक्षमतेनें हातभार लावला पाहिजे. शेतकरी बुडाला तरी थकबाकी वसूल झाली पाहिजे, अवर्षणासारख्या आपत्तीमुळें जुनी बाकी राहिली तरी नवें कर्ज थोडेसुद्धां त्यास द्यावयाचें नाहीं, अशी घातुक वृत्ति उपयोगाची नाहीं. भागीदार, ठेवीदार, कर्जदार, ह्यांचे हितसंबंधांत ह्यापुढें मोठा विरोध रहाणें अशक्य आहे आर्थिक घडी नीट राहिली नाहीं, तर शेतकरीच काय पण प्रत्यक्ष रिझर्व्ह बँकहि संकटांत आल्याविना रहाणार नाहीं. ह्या परिस्थितीचा प्रत्येकानें जबाबदारीपूर्वक व व्यापक दृष्टीनें विचार केला पाहिजे; कोणीहि तात्कालिक फायद्याकडे पहातां कामा नये. ही गोष्ट शेतकऱ्यांनींहि मनन केली पाहिजे. नव्या अर्थव्यवस्थेंत जिल्हा बँकेचें घटक स्थान लक्षांत ठेवूनच सर्वांनीं ती व्यवस्था यशस्वी केली पाहिजे" श्री. ध. रा. गाडगीळ ह्यांचें पु सें. को. बँकेच्या वार्षिक सभेंत भाषण.

---

### पोर्तुगीज बँकेस भारतांत लायसेन्स नाकारला

"बँको नॅशनल अल्ट्रामरिनो" ह्या पोर्तुगीज बँकेस भारतांत व्यवहार चालू ठेवण्यासाठी लायसेन्स रिझर्व्ह बँकेनें नाकारला असून, सोमवार, ता. ८ पासून ती बंद राहिली आहे. भारतांत नोंदलेल्या कंपन्यांना पोर्तुगाल इतर कंपन्यांच्या समान वागवीत नाहीं, अशी रिझर्व्ह बँकेची खात्री झाली आहे पोर्तुगीज इंडियांत (गोवा) शाखा उघडण्याचे भारतीय बँकांचे अर्ज गेलीं पांच वर्षे एकसारखे फेटाळले गेले आहेत. हीच परिस्थिति तीन महिन्यानंतरहि चालू राहिली, तर रिझर्व्ह बँक पोर्तुगीज बँकेस भारतांत लायसेन्स नाकारील, असें रिझर्व्ह बँकेनें पोर्तुगीज सरकारला २६ एप्रिल रोजीं कळविलें, परंतु त्या सरकारच्या धोरणांत बदल न झाल्यामुळें रिझर्व्ह बँकेला हा जालीम उपाय योजावा लागला आहे.

---

### कराची बंदरास धोका?

कराची बंदरांत गाळ साठत चालला असून समुद्र मागें हटत आहे. त्यामुळें बंदराच्या तोंडाजवळील पाण्याची खोली कमी होत चालली आहे. ही प्रवृत्ति कायम राहिल्यास, १०० वर्षांचे अवधींत कराची बंदर निरुपयोगी होऊन जाईल.

---

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.